दिव्य मराठी

जालना 19-08-2024

# कृषी अनुसंधान परिषदेच्या शास्त्रज्ञांची केव्हीकेला भेट

## आधुनिक शेतीला होणाऱ्या फायद्याची घेतली माहिती



केव्हीके अंतर्गत सुरू असलेल्या नवीन प्रयोगाची माहिती तज्ज्ञांनी जाणुन घेतली.

**प्रतिनिधी** | जालना

केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंग चौहान यांच्या निर्देशानुसार भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या संशोधन संस्था आणि कृषी विद्यापीठे यांचे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत किती प्रभावीपणे पोहोचते व हे तंत्रज्ञान पोहोचवण्यामध्ये कृषी विज्ञान केंद्र कशा प्रकारे भूमिका बजावत आहे याचा आढावा सुरू आहे. या अंतर्गत केव्हीकेत पुणे येथील राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्राचे प्रधान शास्त्रज्ञ डॉ. एस. डी. रामटेके, शास्त्रज्ञ डॉ. पी. एच. निकुंभे यांनी भेट दिली.

या वेळी त्यांनी कृषी विज्ञान केंद्रामार्फत मागील तीन वर्षांत घेण्यात आलेले कार्यक्रम, प्रशिक्षण, प्रथमदर्शी पीक प्रात्यक्षिके, शेतावरील चाचण्यांचे आयोजन यासंदर्भात माहिती जाणून घेतली. कृषी विज्ञान केंद्राची शेतकऱ्यांपर्यंत योग्य वेळी माहिती पोहोचवण्याची पद्धत, जिल्ह्यातील कृषी विभाग, आत्मा व तत्सम समांतर खात्यांशी असलेला समन्वय, त्यांना देण्यात येणारे तांत्रिक पाठबळ, शेतकऱ्यांद्वारे तंत्रज्ञान अवलंबनाचे प्रमाण, त्यांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष वाढलेले उत्पादन, शेतकऱ्यांच्या जीवनात झालेले दीर्घकालीन बदल, शेतकऱ्यांच्या समस्यांचे निवारण करण्याची पद्धत, कार्यक्षेत्रातील शेतकरी उत्पादक कंपन्या, महिला स्वयंसहायता समूह, पीक उत्पादन गट यांना होणारी मदत, कृषी विज्ञान केंद्रातील उपलब्ध सुविधा, निविष्ठांची उपलब्धता, कृषी विज्ञान केंद्राच्या अडीअडचणी कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून सुरू झालेले उद्योग व्यवसाय इत्यादींबाबत सखोल माहिती जाणून घेतली.

पुण्य नगरी

# भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या शास्त्रज्ञांची कृषी विज्ञान केंद्रास भेट

**जालना/प्रतिनिधी**

भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या वतीने पुणे येथील राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्राचे प्रधान शास्त्रज्ञ डॉ.एस. डी. रामटेके आणि शास्त्रज्ञ डॉ.पी. एच. निकुंभे यांनी खरपुडी येथील कृषी विज्ञान केंद्रास दि. १६ ऑगस्ट रोजी भेट देऊन कामांची पाहणी केली, तसेच कृषी विज्ञान केंद्राच्या कामकाजाचा आढावा घेतला. केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंग चौहान यांच्या निर्देशानुसार भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या संशोधन संस्था आणि कृषी विद्यापीठे यांचे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत किती प्रभावीपणे पोहोचते व हे तंत्रज्ञान पोहोचविण्यामध्ये कृषी विज्ञान केंद्र कशा प्रकारे भूमिका बजावत आहे, या संदर्भात आढावा घेण्याच्या हेतूने सदरील शास्त्रज्ञांनी कृषी विज्ञान केंद्रास भेट दिली. संपूर्ण देशातील ७३१ कृषी विज्ञान केंद्राच्या कामाचा आढावा भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या शास्त्रज्ञांमार्फत घेतल्या जात असून, त्याचाच एक भाग म्हणून डॉ. रामटेके आणि डॉ. निकुंभे यांनी कृषी विज्ञान केंद्रास भेट दिली. त्यांच्या भेटीत त्यांनी कृषी विज्ञान केंद्रामार्फत मागील तीन वर्षात घेण्यात आलेले कार्यक्रम प्रशिक्षणे, प्रथमदर्शी पीक प्रात्यक्षिके, शेतावरील चाचण्यांचे आयोजन यासंदर्भात माहिती जाणून घेतली. वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ.एस.व्ही. सोनुने यांनी सर्व सहकारी शास्त्रज्ञांच्या उपस्थितीत त्यांच्यासमोर पॉवर पॉइंटच्या माध्यमातून सादरीकरण केले. याप्रसंगी कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. एस. व्ही. सोनुने यांच्यासह अजय मिटकरी, राहुल चौधरी, डॉ. संगीता कऱ्हाळे, डॉ. हनुमंत आगे, शशिकांत पाटील, सुनील कळम, कृषी अभियंता पंडित वासरे, कॉम्पुटर प्रोग्रामर फहादखान पठाण, निकरा प्रकल्पाचे वरिष्ठ संशोधन सहाय्यक सलमान पठाण, कार्यालय अधिक्षक सुधीर सूर्यवंशी, स्टेनो पंजाब थिटे यांचेसह सर्व शास्त्रज्ञ अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती.



भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या शास्त्रज्ञांनी कृषी विज्ञान केंद्रास भेट देऊन पाहणी केली.

Jalna Edition

Aug 19, 2024 Page No. 02

Powered by: erelego.com

सकाळ

# शास्त्रज्ञांनी दिली कृषी विज्ञान केंद्राला भेट

■ सकाळ वृत्तसेवा

जालना,ता.१८ : भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या वतीने पुणे येथील राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्राचे प्रधान शास्त्रज्ञ डॉ.एस.डी.रामटेके आणि शास्त्रज्ञ डॉ.पी.एच.निकुंभे यांनी खरपुडी येथील कृषी विज्ञान केंद्रास शुक्रवारी (ता.१६) भेट देऊन कामांची पाहणी केली. तसेच कृषी विज्ञान केंद्राच्या कामकाजाचा आढावा घेतला.

यावेळी कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ.एस.व्ही. सोनुने, विशेषज्ञ अजय मिटकरी, राहुल चौधरी, डॉ. संगीता कऱ्हाळे, डॉ. हनुमंत आगे, शशिकांत पाटील, सुनील कळम, कृषी अभियंता पंडित वासरे, कॉम्पुटर प्रोग्रॅमर फहादखान पठाण, निकरा प्रकल्पाचे वरिष्ठ संशोधन सहाय्यक सलमान पठाण, कार्यालय अधिक्षक सुधीर सूर्यवंशी, स्टेनो पंजाब थिटे यांचेसह सर्व शास्त्रज्ञ अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती.

केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान यांच्या निर्देशानुसार भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या संशोधन संस्था आणि कृषी विद्यापीठे यांचे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत किती प्रभावीपणे पोहोचते, हे तंत्रज्ञान पोहोचवण्यामध्ये कृषी विज्ञान केंद्र कशा प्रकारे भूमिका बजावत आहे. या संदर्भात आढावा घेण्याच्या हेतूने डॉ. रामटेके आणि डॉ. निकुंभे यांनी कृषी विज्ञान केंद्रास भेट दिली. त्यांच्या भेटीत त्यांनी कृषी विज्ञान केंद्रामार्फत मागील तीन वर्षात घेण्यात आलेले कार्यक्रम प्रशिक्षणे, प्रथमदर्शी पीक प्रात्यक्षिके, शेतावरील चाचण्यांचे आयोजन यासंदर्भात माहिती जाणून घेतली. यांनी सर्व सहकारी शास्त्रज्ञांच्या उपस्थितीत त्यांच्यासमोर पॉवर पॉइंटच्या माध्यमातून सादरीकरण केले.

जिल्ह्यात द्राक्षाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढत असल्यामुळे कृषी विज्ञान केंद्राने द्राक्ष संशोधन केंद्राच्या मदतीने द्राक्ष पिकातील आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. सदरील शास्त्रज्ञांनी कृषी विज्ञान केंद्राच्या प्रक्षेत्रास भेट देऊन प्रक्षेत्रावरील सर्व प्रात्यक्षिके व उपक्रमांची माहिती जाणून घेतली व समाधान व्यक्त केले. कृषी विज्ञान केंद्राद्वारे आयोजित तीन दिवसीय शेती यांत्रिकीकरण या विषयावरील प्रशिक्षणाच्या समारोप कार्यक्रमामध्ये सहभाग नोंदविला त्यांनी काही निवडक शेतकऱ्यांशी चर्चाही केली.